**वृक्षदिंडी कार्यक्रमात सहभाग :** (दि. २० सप्टेंबर, २०१९)

दि. २० सप्टेंबर, २०१९ रोजी विविध सामाजिक व शैक्षणिक संघटनांच्या वतीने लातूर शहरात ‘ओझोन वायु’च्या जनजागृती संदर्भात पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षदिंडी काढण्यात आली. या वृक्षदिंडीमध्ये राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी स्वयंसेवकांनी सक्रीय सहभाग नोंदविला व वृक्ष लागवडी संदर्भात जनजागृती करण्यात आली. ‘वृक्ष दिंडी’ यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

